iPAT

Institute of
Personal Assistant Training®
Power Behind Powerful

www.ipatinstitute.com

# पॉलिटिकल पीए

## बदलत्या  राजकीय काळाची गरज

युवकांना राजकीय कार्यक्षेत्रात व
पोलिटिकल बॅक ऑफिस मध्ये काम
करण्यासाठी सुवर्ण संधी

9890 9890 66



# पॉलिटिकल PA या श्रेणीत काम करत असताना

पॉलिटिकल PA या श्रेणीत काम करत असताना विविध प्रकार चे प्रकाराची कामे करावी लागतात या कामांची व्याप्ती त्या राजकीय व्यक्ती किंवा त्या राजकीय व्यक्ती कडे असणारा कार्यभार यावर अवलंबून असते यामध्ये राजकीय नेत्यांना PA लागतं लागतात ते नेते म्हणजे नगरसेवक, आमदार, खासदार, MLC, राज्यसभा खासदार, पक्षाध्यक्ष, पक्षातील विविध प्रमुख नेते व पक्षातील विविध असेल चे अध्यक्ष या पदावर असताना त्यांना PA ची गरज असते किंवा पॉलिटिकल बॅक ऑफिस मध्ये काम करणाऱ्या विविध व्यक्ती हवे असतात.

राजकीय PA ना स्वीय सहाय्यक असेदेखील म्हणतात तसे तर हे पद फार महत्त्वाचे आहे पण बऱ्याचदा राजकीय व्यक्ती जवळ एकापेक्षा जास्त स्वीय सहाय्यक असतात व त्यामुळे कोणता PA महत्त्वाचा किंवा कोणत्या पीए कडे काय जबाबदारी आहे हे कळण्यास अवघड जाते.

बरेचदा यांचा त्याचा एक खास PA ठरलेला असतो त्यांच्यासोबत तो बरेच दिवस काम करत असतो. किंवा बऱ्याच वर्षांपासून काम करत असतो जसा जास्त वेळ तो व्यक्तीसाठी काम करतो तसा तो नवनवीन कामे शिकत जातो त्यांनी त्याची सर्वांगीण माहिती काम करण्याची पद्धत, त्याची कार्यशैली, आवडीनिवडी व कधी कोणती माहिती लागू शकेल याची त्याला पूर्ण कल्पना असते किंवा त्याचा अंदाज येऊ शकतो.

बऱ्याचदा राजकीय नेते आपल्या मतदार संघातील एखाद्या व्यक्तीला एखाद्या व्यक्तीला सहाय्यक म्हणून स्वीय सहाय्यक म्हणून ठेवण्यास प्राधान्य देतात कारण त्याला या मतदारसंघातील भौगोलिक सांस्कृतिक राजकीय व ऐतिहासिक माहिती असते. त्या भागातील लोकांची संपर्क साधा साधताना तो येणाऱ्या लोकांना आपलासा वाटतो. प्रत्येक भागात बोलताना विशिष्ट लय व शब्दांचा वापर होत असतो जो स्थानिक पीएला लगेच समजू शकतो.

भारतात पीएस संदर्भात विशेष ट्रेनिंग सेंटर नाही किंवा स्वीय सहाय्यक या विषयावर राजकीय दृष्ट्या कुठला अभ्यासक्रम किंवा पुस्तके उपलब्ध नाही या क्षेत्रात काम करत असणारे pa काळाबरोबरच आपली कामे शिकतात माहिती करून घेतात,पी ए साठी लागणारे गुण व कौशल्य त्यांना काही कालांतराने प्राप्त होतात.

राजकीय व्यक्तींची कामे बघताना अतिशय खबरदारी ने व चातुर्याने काम करावे लागते ते. आपला नेता जेवढा मोठा प्रसिद्ध कामाची व्यक्तीदेखील एवढी मोठी असते ती सांभाळून त्याचबरोबर कामाची गोपनीयता गांभीर्य लिखित जपावे लागते त्याकरता संपर्क कौशल्य अतिशय महत्त्वाचे आहे व सर्वात महत्त्वाचे व अनिवार्य म्हणजे विश्वासू वृत्तीने काम करावे लागते.

## करावी लागणारी विविध प्रकारची कामे

- वेळेचे नियोजन करणे, डायरी मेंटेन करणे, कार्यक्रम स्वीकारणे
- कार्यक्रमाला जाणे न जमल्यास आवर्जून पत्र पाठवणे
- आलेला पत्रव्यवहार पत्रव्यवहार पाहणे
- महत्त्वाची पत्रे बाहेर जात असल्यास त्याच्यावर विशेष लक्ष देणे
- राजकीय दौरे तयार करणे
- भाषणे तयार करणे
- ताज्या किंवा ज्वलंत प्रश्नाची माहिती देणे
- कार्यक्रमाची नियोजन करणे
- राजकीय शिष्टाचार जपणे
- मीटिंग लावणे अजेंडा तयार करणे मीटिंगची निरोप देणे
- साहेबांच्या वतीने फोन करणे व माहिती मागवून घेणे आलेल्या माहितीच्या वापर आपल्या वरिष्ठाला समजेल अशा प्रकारात तयार करून सादर करणे
- एखाद्या कार्यक्रमाचे प्रसिद्धीपत्रक तयार करणे- प्रेस रिलिज
- राजकीय कार्य अहवाल तयार करणे
- घरातील व्यक्तींशी संपर्क ठेवणे- मित्रमंडळी नातेवाईक यांचे वाढदिवस एनिवर्सरी या तारखा आठवण करून देणे
- अचानक एका वेळेस अनेक कामे करावी लागली शांतपणे प्राधान्यक्रम ठरवून महत्वाची कमी-अधिक करणे

आमदार किंवा खासदार यांचे पीए यांना वरीलपैकी काही कामे करण्याचा अनुभव असणे अनिवार्य आहे

# पॉलिटिकल PA या श्रेणीत काम करत असताना

प्रामुख्याने नेत्यांचा पीए म्हणून काम करत असताना अनेक लोकांशी बोलावे लागते व त्यांना बराच वेळ द्यावा लागतो. बऱ्याचदा लोक साहेबांना भेटून झाल्यावर pa ला भेटतात काय काम होते परत सांगतात त्याबद्दल काही सूचना देतात व सविस्तर बोलत बसतात. व आपल्याला वारंवार फोन करून आमच्या कामाचे काय झाले काम कुठपर्यंत आले आहे लवकर करण्याची विनंती करत असतात. बऱ्याचदा pa फोन करून काम करावे अशी लोकांची अपेक्षा असते. फोन करणे पत्र देणे माहिती देणे अशा विविध मागण्या लोक सतत करत असतात. कुठली काम करत असताना कामाची पूर्ण माहिती घेणे व प्रोटोकॉल नुसार काम करणे आणि वारी असते. बरेच वेळा वरिष्ठांना काय काम आहे काम आहे कुठल्या विभागाचे आहे व ते कशा पद्धतीने करावे लागेल याबद्दल साहेबांना brifing द्यावे लागते. अशी अनेक कामे विविध प्रकारांनी करावी लागतात व कधीकधी आपल्या संयमाची परीक्षादेखील होते.

बऱ्याचदा नेत्यांच्या पियाला अधिकार प्राप्त असतात त्यामुळे लोक त्यांच्याकडून परस्पर कामे करावी असा तगादा लावतात त्यावेळी समोर असलेले काम त्याचा प्रसंग व गांभीर्य याचे भान ठेवून निर्णय घ्यावे लागतात.

भारतीय राजकीय व्यवस्थेत कधीकधी नेत्यांपेक्षा खूपच भाव खातात किंवा चाय से ज्यादा किटली गरम असे टोमणे ऐकावे लागतात म्हणून आपण आपले पद व साहेबांचा स्वभाव बघून आपल्या वागण्यात किंवा लोकांशी बोलताना कुणी नाराज होणार नाही किंवा चुकीचे अंदाज बांधणार नाही याचे भान ठेवावे.

बऱ्याचदा साहेबांनीच काही गोष्टी सांगितल्या असतात ज्या ते स्वतः लोकांना सांगणे टाळतात किंवा सांगू शकत नाही व लोकांची नाराजीला सामोरे जावे लागते अशा वेळेस माहिती असून देखील सांगितल्याप्रमाणे बोलावे लागते किंवा निरोप द्यावे लागतात.

राजकीय व्यक्तीचे पीए म्हणून काम करत असताना महत्त्वाचे स्टेशनरी शिक्के व कागदपत्रे सांभाळणे हेदेखील एक महत्त्वाचे काम आहे अर्थात ती एक जबाबदारी आहे बऱ्याचदा साहेबांचे लेटरहेड व सही शिक्का यांचा वापर अपरोक्ष करून काही पत्रे पाठवली जाऊ शकतात याची खबरदारी घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. त्यामुळे राजकीय प्रॉब्लेम येऊ शकतात.

राजकीय म्हणून काम करत असताना फक्त नेता व जनता एवढाच कामाचा नसतो तर त्यात विविध प्रकारच्या व्यक्ती व संस्थांची देखील संपर्क व संबंध येतो. सरकारी ऑफिसर, खाजगी कंपन्या, सामाजिक संस्था, महिला गट, विद्यार्थ्यांचे प्रश्न व संघटना, पालक वर्ग, सीनियर सिटीजन, कलाकार अशा प्रकारच्या व्यक्तींची भेटीगाठी होत राहतात यासाठी या सर्व प्रकारच्या लोकांशी बोलण्याचा अनुभव पूर्वीपासून असेल तर योग्यच नाहीतर त्याला संयमाने या सर्वांशी बोलावे लागेल.

याचा संबंध रोजचे रोज येणाऱ्या व्यक्ती म्हणजे त्याचे वरिष्ठ ऑफिसमधील स्टाफ शिपाई क्लर्क ड्रायव्हर इतर पीए राजकीय कार्यकर्ते पत्रकार पक्षांतर्गत वरिष्ठ व्यक्ती, या सर्वांशी आपल्याला आनंदाचे संभाषण करता यायला हवे याच्या जर तणाव असेल तर रोजनिशीच्या कामात त्याचा परिणाम होतो.

राजकीय pa शिकलेला असावा ही आजच्या काळाची गरज आहे. कम्प्युटर इंग्रजी भाषा माहिती व तंत्रज्ञान विविध मोबाईल व सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन याचे ज्ञान असणे तर महत्त्वाचे आहे. ज्याप्रमाणे आपल्या नेत्याचे कार्यक्षेत्र वाढत जाते त्याचप्रमाणे पीएला नवीन नवीन गुण आत्मसात करावे लागतात.